## ई निविदा सुचना क्रमांक 03/2026-27
## सिंधुदूर्ग जिल्हा परिषद - जलसंधारण विभाग
## सन 2025-2026 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त असलेल्या कामांची ई निविदा कार्यवाही
(पहिली मागणी)

जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (लपा) सिंधुदूर्ग (दुरध्वनी क्रमांक 02362-228793) यांजकडून खालील कामांसाठी खालील शर्तीना अनुसरुन महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाने विहित केलेल्या प्राधिकरणानी दिलेल्या योग्य त्या वर्गात नोंदणी केलेल्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून ऑनलाईन टक्केवारी दराच्या ई निविदा मागविणेत येत आहेत.

| क्र. | कामाचे नांव | कामाची अंदापत्रकिय रक्कम | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फी | नोंदणी वर्ग (मसस/नों.ठे/सुबेअ.) | प्रसिद्धी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 4 | 3 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | कारिवडे मारुती मंदिर पडवेवाडी येथे बंधारा बांधणे, ता.सावंतवाडी | 3668138/- | 2967796/- | 37000/- | 1000/- | सुशिक्षित बेरोजगार अभियंता ठेकेदार - वर्ग 5 | 15 दिवस |

संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येईल. निविदेसंबंधी सर्व सुचना http://mahatenders.gov.in संकेत स्थळावर प्रसिध्दी करणेत येतील. निविदेकरीता आवश्यक सर्व कागदपत्रांची माहिती वरील संकेत स्थळावर उपलब्ध असेल व सर्व संबंधीतांनी याच संकेतस्थळावर निविदा भराव्यात. निविदा सुपूर्द करताना खालील गोष्टींचा अंतर्भाव असणे अनिवार्य राहील.

01.निविदा फॉर्म फी व इसारा फी (EMD) (बयाणा रक्कम) ही वर नमुद संकेत स्थळावर दर्शविलेनुसार कत्रांटदाराच्या बँक खात्यातुन Online /NEFT RTGS / NET Banking व्दारे भरणा करणे बंधनकारक राहील बयाणा रक्कम भरली असल्याची खात्री होणेसाठी बँक पासबुक व चलन निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील . निविदा फी व इसारा रक्कम NET Banking व्दारे रक्कमा भरणा केलेबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र युनिक ट्रान्झॅक्शन रजिस्ट्रेशन (UTR) पावती क्रमांक तांत्रिक लिफाफ्यासोबत अपलोड करणेचा आहे. बँक पासबुक खाती ज्या ठिकाणी सदर व्यवहाराची नोंद झाली आहे, त्या पृष्ठाची छायांकित जोडणे आवश्यक आहे. याकरीता संबंधीत मक्तेदार यांनी आपले बँक खाते संबंधीत बँकेचे शाखेकडून आवश्यक ती कार्यवाही (Online Account ) करुन घेणेची आहे.

02.वरील सादरीकरणाची पुर्तता न केल्यास संबंधीत BID अपात्र ठरविणेत येईल. व BID उघडले जाणार नाही.

03. मक्तेदाराने सादर केलेले दर हे निविदा उघडल्याच्या दिनांकापासून 180 दिवसांपर्यन्त बंधनकारक रहातील.

04. कोणतीही एक अगर सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर वा नामंजूर करणेचा अधिकार मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सिंधुदुर्ग यांनी राखून ठेवलेला आहे.

05. मक्तेदार यांनी दर हे B O Q फॉर्म मध्ये ऑनलाईन सादर करावयाचे आहेत.

06. मक्तेदार यांचे ग्रामविकास व जलसंधारण विभाग अंतर्गत जिल्हा परिषद नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

07. निविदा नामंजूर झाल्यास त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

08. निविदा मंजूर झाल्यावर करारपत्र व इतर कागदपत्र ठरवून दिलेल्या मुदतीत पूर्ण न केल्यास बयाणा रक्कम जप्त करणेत येईल.

09. प्रसिध्द केलेले कोणतेही काम निविदा सूचीतून वगळणेत येईल. तसे शुध्दीपत्रक प्रसिध्द करणेत येईल. त्याबाबत कोणाही व्यक्तीस अगर संस्थेस खुलासा मागता येणार नाही.

10. निविदा मजकुरात, रक्कमेत वा अन्य कोणत्याही बाबीत बदल झाल्यास तसे शुध्दीपत्रक प्रसिध्द करणेत येईल. त्याकरीता निविदा भरावयाच्या अंतिम वेळेपर्यंत तशी शहानिशा संबंधीतांनी करावयाची आहे.

11. ऑनलाईनव्दारे मागविणेत आलेले सर्व कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा निविदा तांत्रिक छाननी मध्ये अपात्र ठरविणेत येईल.

12. उपरोक्त मजकूरात अथवा रक्कमेत बदल संभवू शकतो. ऑनलाईन प्रसिध्दी मजकूर तसेच रक्कम अंतिम राहील.

13. महा. शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिण 2017/प्र.क्र./121/(भाग-2)/इमारती- दिनांक 27-09-2022 नुसार लागू झालेल्या जीएसटीच्या कराच्या बोजाचा विचार करुन निविदा सादर करणेची आहे.

14. प्रपत्र 01 ते 04 परिपुर्ण भरण्यात यावे. प्रपत्र 1 मध्ये ( चालू आर्थिक वर्षा पर्यंतची हाती असलेल्या कामाचा तपशील व ज्या कामासाठी निविदा भरावयाची त्याचा तपशील ) प्रपत्र-2 (चालू आर्थिक वर्षा पर्यंतची अशा प्रकारची आणि यापुर्वी पार पडलेल्या कामांचा तपशील) प्रपत्र-3 (निवेदन मधील कामाकरीता त्वरीत उपलब्ध होणा-या प्रकल्प व यंत्रसामुग्रीचा तपशील) प्रपत्र-4 ( मक्तेदाराकडे उपलब्ध तांत्रिक कर्मचा-याचा तपशील), इत्यादी कागदपत्र तांत्रिक लिफाप्यात सादर केले नसलेस किवा प्रपत्र 01 ते 04 मध्ये खात्याच्या दृष्टीने तांत्रिक दृष्टया त्रुटी असल्यास मक्तेदारास कोणताही पत्रव्यवहार न करता निविदा अपात्र ठरविणेत येईल.

15. सन 2025-26 आर्थिक वर्षातील व्यवसाय कर चलन / टॅक्स क्लिअरन्स सर्टीफिकेट, व GST इ. कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

16. ई-निविदा लिफाफा क्रमांक 01 व लिफाफा क्रमांक 02 उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-या L-1

निविदाकाराने Add Performance Security Deposit विहित मुदतीत भरणा करण्यात यावी.

17. देकार 10% कमी दरापर्यंत 1% व 15% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रकमेसाठी दोन पटीने रक्कम Add Performance Security Deposit सादर करणे अनिवार्य राहिल. उदा.19% कमी दर (19-15=4%X2=8%) व 10 टक्के कमी दरापर्यंत 1 टक्का व 15 टक्के पर्यंत कमी दरापर्यंत (15% - 10%=5%) तसेच (19-15)= 4% करिता (4 x 2=) 8% असे एकुण (1+5+8) = 14%.

18. शासन निर्णय दि.05.04.2023 अन्वये सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी विहित नमुन्यातील बंधपत्र निविदाधारक यांचे लेटर हेडवर सादर करणे आवश्यक आहे.

19. शासन निर्णय दिनांक 17 सप्टेंबर 2019 नुसार तांत्रिक लिफाफाच्या पडताळणी अंती पात्र कंत्राटराने "माझा आर्थिक देकार उघडण्यात येवू नये अथवा "मी स्पर्धेतून माघार घेत आहे" असे कळविल्यास ते स्पष्टपणे नाकारण्यात येईल व संबंधित कंत्राटदराचा आर्थिक देकार उघडण्यात येईल.

20. सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या नोंदणी कमाल मर्यादा जरी रु.50 लक्ष असली तरी नविन नोंदणी झालेला सुशिक्षीत बेरोजगार अभियंता पहिले काम रु.15 लक्ष अंदाजपत्रकीय किंमतीच्या मर्यादेत घेऊ शकेल. रु.15 लक्ष अंदाजपत्रकीय किंमतीच्या आतील कामासाठी कोणतीही पुर्वानुभवाची आवश्यकता नसेल. तसचे रु.15 लक्ष अंदाजपत्रकीय किमतीच्या आतील काम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतरच सदर अभियंता रु.50 लक्ष अंदाजपत्रकीय किमती पर्यंतचे काम करण्यासाठी पात्र असेल. म्हणजेच रू.15 लक्ष ते रु.50 लक्ष पर्यंतच्या अंदाजित किंमतीचे काम करण्यासाठी रु.15 लक्ष पर्यंत किमतीचे काम समाधानकारकरित्या पूर्ण केल्याचा पूर्वानुभव आवश्यक राहील.

21. जिल्हा नियोजन समिती मार्फत कामात बदल सुचविण्यात आल्यास निविदा प्रक्रिया रद्द करणेत येईल.

22. निविदा विषयक शासन निर्णय व शासनाचे परिपत्रके निविदेस लागू राहतील.

(सुदेश राणे)
जिल्हा जलसंधारण अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

जा.क.सिंजिप/लपा/आस्था-1/ 94 /2026.
जिल्हा परिषद (लपा) सिंधुदुर्ग.
दिनांक /04/2026

Signature Not Verified
Digitally signed by SUDESH AMRUT RANE
Date: 2026.05.08 13:18:43 IST
Location: Maharashtra-MH